आशेवर जगते. आमच्या वेळीही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्या वेळी यशवंत पगार या निर्मात्याने फारच चांगला तोडगा शोधला होता. त्याने तीन-दोन-एक असे तिकिट दर ठेवून नाटक लावण्यास सुरुवात केली. जनता नाटक म्हणून ती नाटकं प्रसिद्ध झाली. त्याला फार चांगला प्रतिसाद मिळाला. नाटकं हाऊस फुल्ल गर्दीने चालू लागली. आम्ही सर्व नाट्य-कर्मी अशा नाटकांना नेहमीपेक्षा थोडे पैसे कमी घेत असू. जाहिरातवाले म्हणजे वृत्तपत्रे देखील जाहीरातीत थोडे कन्सेशन देत ह्या सर्व गोष्टीमुळे नाटकं चालू लागली. त्यांची संख्याही वाढली. त्यामुळे नाट्य-कर्मीचा फायदाच झाला. असाच प्रयोग आता करण्यास काय हरकत आहे. सध्याचा तिकिट दर सर्वसामान्य नाट्य-प्रेमींना न परवडणारा आहे. जर तिकीट दर कमी केले तर मला वाटत नाटकं चालतील. अर्थात नाट्य-कर्मींनी थोडे-थोडे पैसे कमी करावेत. बॅक-स्टेज आर्टिस्ट सोडून सर्वानी. आपण सर्वांनी मिळून जर आवाज उठवला तर पेपरवाले, थियेटर्स त्यांचेही दर कमी करतील. पुर्वीही त्या लोकांनी दर कमी केले होते, आताही करतील. ही सवलत फक्त जनता नाटकांना मिळावी.ज्यांची नाटक जोरात चाललीत त्यांनी दर कमी नाही केले तरी चालेल. त्यांना सवलतही मिळणार नाही. फक्त जनता नाटकांसाठी ही सवलत असेल. हल्ली पुष्कळशी थियेटर्स त्या-त्या गावच्या म्युनिसिपल कार्पोरेशनची असतात. तेव्हा तिथल्या पुढाऱ्याची व प्रतिष्ठीत नागरिकांची मदत घेतली तर हे सहज शक्य आहे.

मित्रांनो या माझ्या एका वर्षामध्ये काय-काय करायचे त्या योजना आहेत. तुम्ही माझ्या प्रिय रसिकहो ....... प्रिय रंगकर्मी हो ....... तुम्ही म्हणाल एका वर्षामध्ये हे सर्व करणे अशक्य आहे. मी ठामपणे म्हणतो की, हे शक्य आहे. एक वर्ष म्हणजे तीनशे पासष्ट दिवस आणि तीनशे पासष्ट दिवस म्हणजे कमी नाहीत. मी फार आशावादी व कर्मवादी आहे. पण यासाठी आपण सर्व कलेची उपासना करणाऱ्यांनी...... कलेची पुजा करणाऱ्यांनी...... कलेवर जगणाऱ्यांनी एकत्र यावयास हवं...... जनतेचा आपल्याला आशिर्वाद आहे...... मदत आहे...... जनतेने कलाकारांना पूर्वीही मदत व आशिर्वाद दिला होता . आताही मदत व आशिर्वाद आहेत व पुढेही अनंत काळ आशिर्वाद व मदत करत राहणार आहेत. हे आपलं अजोड, अतुट, प्रेमाचं नातं असच कायमचं घट्ट राहणार आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!